

नमस्कार! मी रघु. माझी पत्नी सुषमा आणि आम्ही आमच्या वॉर्डात सामुदायिक शौचालयचे केअर-टेकर म्हणून काम करतो. मला माहीत आहे, आपल्यापैकी अनेकजण कोविड 19 महामारीच्या काळात नागरिकांची सेवा करीत आहेत. करोना व्हायरसपासून तुमचे संरक्षण होण्यासाठी आवश्यक संरक्षक सूचना मी आपल्याला सांगू इच्छितो.

**विशेष नोंध : या सूचना नियमित कार्यपद्धतीचा भाग नसून केवळ सफाई कामगारांनी कोविड 19 महामारीच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती अतिरिक्त काळजी घ्यावी याकडे लक्ष वेधण्यासाठी आहेत.**

## आपल्या घरातून कामावर जाण्यापूर्वी या गोष्टी आवर्जून करा-



**1. आपले शरीर पूर्ण झाकले जाईल असे कपडे वापरा**



**2. जर आपल्याला जखम झाली असेल तर त्यावर जलरोधक पट्टी लावा**



**3. पालिकेने दिलेला अत्यावश्यक सेवकाचा पास आपल्याजवळ ठेवा**



**4. हात धुण्यासाठी साबण आणि पाणी तुमच्याबरोबर ठेवा**



**5. हातमोजे, मास्क, एप्रेन, बूट या वैयक्तिक सुरक्षा साधनांचा (PPE) वापर करा** (जेथे मास्क उपलब्ध नसेल तेथे दोन तीन थरांच्या स्वच्छ कपड्याने नाक व तोंड झाकून घ्या)



**6. कपड्यांची अतिरिक्त जोडी आपल्या बरोबर राहुद्या**

## कामाच्या ठिकाणी गेल्यावर या गोष्टी नक्की कराच-

1



हात साबणाने किमान 20 सेकंद धुवा

2




दाखवलेल्या क्रमाने पीपीई घाला

3



वापरकर्त्यांनी एकमेकात अंतर राखण्यासाठी शौचालयाच्या बाहेर वर्तुळ काढा

4




पीपीई घालूनच शौचालय स्वच्छ करा

5




वापरकर्त्यांना कमीतकमी 1 मीटर अंतर ठेवण्यास आणि शौचालय वापरल्यानंतर साबणाने आपले हात धुण्यास सूचना द्या

6



वापरकर्त्यांकडून पैसे घेताना करताना हातमोजे घाला

7




वारंवार हाताळल्या जाणाऱ्या गोष्टींचे वारंवार निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे

8



जेवण करण्यापूर्वी साबणाने हात धुवा

## कार्यालयात काम संपवून परत गेल्यावर-



वैयक्तिक सुरक्षा साधने काढा



हात, चेहरा स्वच्छ धुवा




वापरलेले कपडे बदलून बॅगमध्ये ठेवा



नवीन कपडे घालून, घरी जाण्याचा मास्क घाला





घरी गेल्यावर सर्वप्रथम सुरक्षा साधने, वापरलेले कपडे स्वच्छ धुवून कोरड्या जागी वाळत टाका नंतरच कुटुंबियांना भेटा

**सर्दी, ताप,खोकल्यासारखी लक्षणे आढळल्यास ताबडतोब वैद्यकीय सल्ला घ्या**

**कोरोना व्हायरस वर लढाईत आपण सुरक्षित राहून विजय मिळवूया**

Safety and Dignity to Sanitation Work |Urban Management Centre with support from BMGF | manvita@umcasia.org